Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science & Commerce College Sakri
## Dist. Dhule
## NSS Activity report
2017-18

| Name of the Activity | |
|---|---|
| कै. सौ. गोजरताई भामरे स्मृतिदिन व रक्तगट तपासणी व रक्तदान शिबीर | |
| Date of the activity | **29/08/2017** |
| Organizing Department | NSS |
| No. of teachers Participated | 06 |
| No. of Students Participated | Blood donate-25,blood cheking 88 =123 |
| Collaborating Agency | - |
| Impact of the Activity | To know the value of blood donation |




Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

# अहवाल

२९/०८/२०१७ रोजी माजी आमदार कै. गोजरताई भामरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना एकक, राष्ट्रीय छत्र सेना, प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिराचे उदघाटन विद्या विकास मंडळाचे सचिव आदरणीय आबासाहेब सुरेश रामराव पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळाच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई सुरेश पाटील, प्रा. वंदना पाटील, सौ. मालतीताई तोरवणे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे, जिल्हा रुग्णालय रक्तपेढीच्या डॉ. सुधा मुठा मॅडम उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डी. एल. तोरवणे हे होते.. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवींद्र देवरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनंत पाटील यांनी केले तर आभार डॉ. विजय बच्छाव यांनी मानले.



साक्री : माजी आमदार गोजरताई भामरे यांच्या स्मृतीनिमित्त सी. गो. पाटील महाविद्यालयात रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिरप्रसंगी उपस्थित विद्या विकास मंडळाचे सभापती सुरेश पाटील, संचालिका मंगलाताई पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, जिल्हा रुग्णालय रक्तपेढीच्या डॉ. सुधा मुथा आदी.

## गोजरताई भामरेंच्या स्मृतीनिमित्त स्पर्धा

### सी. गो. पाटील महाविद्यालयात रक्तदान शिबिरासह युवती सभेचे उद्घाटन

सकाळ वृत्तसेवा

साक्री, ता. ३१ : माजी आमदार गोजरताई भामरे यांच्या स्मृती दिनानिमित्त येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात रक्तगट तपासणी व रक्तदान शिबिर तसेच युवती सभेचे उद्घाटन करण्यात आले.

विद्या विकास मंडळाचे सभापती सुरेश पाटील, उपाध्यक्ष चंद्रजित पाटील, संचालिका मंगलताई पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एल. तोरवणे, प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, जिल्हा रुग्णालय रक्तपेढीच्या डॉ. सुधा मुथा, शरद देसले, डी. आर. पाटील बँकेच्या संचालिका मालती तोरवणे, सतीश देसले, भाजप युवा मोर्चा तालुकाध्यक्ष डॉ. देवेंद्र देवरे, शहराध्यक्ष महेंद्र देसले, मालपुरचे माजी सरपंच नयनेश भामरे, प्रवीण भामरे, अनिल भामरे, आदींसह प्राध्यापक, विद्यार्थी आदि उपस्थित होते.

या शिबिरात ३७ दात्यांनी रक्तदान केले तर ३०० हून अधिक विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करण्यात आली. डॉ. मुथा यांनी रक्तदानाचे महत्त्व सांगितले. युवती सभेचे उद्घाटन दहिवेल येथील प्रा. वंदना पाटील यांच्या हस्ते झाले. त्यांनी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या विषयावर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. अनंद पाटील व प्रा. आर. जी. काकुस्ते यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. विजय बच्छाव यांनी आभार मानले.

#### भाजयुमोतर्फे कबड्डी स्पर्धा

'खेलो भारत अभियाना'तर्गत साक्री तालुका भाजयुमोतर्फे कबडी स्पर्धा झाल्या. मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजित पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उपविभागीय पोलिस अधिकारी नीलेश सोनवणे, जिल्हा परिषद सदस्या मंगलाताई पाटील, उषा ठाकरे, आदिवासी आघाडीचे उपाध्यक्ष मोहन सूर्यवंशी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राम भदाणे, तालुकाध्यक्ष डॉ. देवेंद्र देवरे, शहराध्यक्ष महेंद्र देसले, क्रीडा शिक्षक संजय भामरे आदी उपस्थित होते. यात तालुक्यातील १७ संघ सहभागी झाले होते. कासारे व मालपुर हे संघ अंतिम फेरीत दाखल झाले असून, त्यांचा सामना लवकरच होणार आहे. स्पर्धेचे संयोजन युवा मोर्चा तालुकाध्यक्ष डॉ. देवेंद्र देवरे यांनी केले.

Principal
V.V.M.'s S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.'s S.G. Patil Arts, Sci. & Commerce College
SAKRI
Dist. Dhule

Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science & Commerce College Sakri

## Dist. Dhule

## NSS Activity report

2017-18

| Name of the Activity | |
|---|---|
| Nirmaly Collection | |
| Date of the activity | **06/09/2017** |
| Organizing Department | NSS |
| No. of teachers Participated | 03 |
| No. of Students Participated | 41 |
| Collaborating Agency | - |
| Impact of the Activity | To aware students about environmental pollution and composting of wastes |






Sakri Dist. Dhule (stamp)

Principal
V.V.M.s' S.G. Patil
Arts, Science & Commerce College

# अहवाल

०६/०९/२०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एकक तर्फे साक्री शहरातील गणेश मंडळांकडून निर्माल्य संकलनाचे काम करण्यात आले. त्यात प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे यांच्यासोबत कार्यक्रम अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला होता.

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.s' S.G.Patil Arts,Sci. & Commerce College
SAKRI
Dist.Dhule

Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science & Commerce College Sakri
## Dist. Dhule
## NSS Activity report
2017-18

| Name of the Activity | |
|---|---|
| NSS Establishment Day/AIDS Awareness Program | |
| Date of the activity | **24/09/2017** |
| Organizing Department | NSS |
| No. of teachers Participated | 04 |
| No. of Students Participated | 46 |
| Collaborating Agency | - |
| Impact of the Activity | To aware about diseases like HIV AIDS |




V.V.M.s' S. G. Patil Arts, Sci. & Commerce College SAKRI Dist.Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

# अहवाल

२४/०९/२०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवसानिमित्त एड्स जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी ग्रामीण रुग्णालय साक्रीचे एड्स समुपदेशक श्री योगेश नांद्रे यांनी एड्स होण्याची करणे त्याबाबतीत घ्यावयाची खबरदारी तसेच एड्स विषयीचे गैरसमज विडिओ क्लिप द्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे हे होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. अनंत पाटील यांनी केले तर आभार प्रा. आर. जी. काकुस्ते यांनी मानले.

V.V.M.s' S.G.Patil Arts,Sci. & Commerce College SAKRI Dist.Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science & Commerce College Sakri Dist. Dhule

## NSS Activity report 2017-18

| Name of the Activity | |
|---|---|
| World AIDS Day Awareness Rally | |
| Date of the activity | **01/12/2017** |
| Organizing Department | NSS |
| No. of teachers Participated | 06 |
| No. of Students Participated | 40 |
| Collaborating Agency | - |
| Impact of the Activity | To know responsibility of youth about nation building |





Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.s' S.G. Patil Arts, Sci. & Commerce College SAKRI Dist. Dhule

## अहवाल

०१ डिसेंबर २०१७ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एकक तर्फे जागतिक एड्स दिनानिमित्त ग्रामीणरुग्णालयाच्या एकात्मिक समुपदेशन व तपासणी केंद्रातर्फे एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीचे उदघाटन प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांच्या हस्ते झाले. आणि संपूर्ण साक्री शहरातून फिरल्यानंतर ग्रामीण रुग्णालय साक्री येथे रॅलीचा समारोप झाला. तेथे ग्रामीण रुग्णालयाच्या वैधकीय अधिकारी डॉ. साधना पाटील यांनी विद्यार्थ्यांना एड्स आजाराविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना एड्स जनजागृतीची शपथही देण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनंत पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा. आर. जी. काकुस्ते यांनी मानले.




सकाळ
धुळे, सोमवार,
४ डिसेंबर २०१७

### साक्री ग्रामीण रुग्णालयातर्फे एड्स जनजागृतीपर रॅली

सकाळ वृत्तसेवा

साक्री, ता. ३ : जागतिक एड्स दिनानिमित्त येथील सी. गो. पाटील कनिष्ठ महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयाच्या एकात्मिक समुपदेशन व तपासणी केंद्रातर्फे आज जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये सी. गो. पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक, तसेच समुपदेशन केंद्राचे अधिकारी, कर्मचारी सहभागी झाले होते.

महाविद्यालयात प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांच्या हस्ते रॅलीचे उद्घाटन झाले. ग्रामीण रुग्णालयात रॅलीचा समारोप झाला. तेथे ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. साधना पाटील यांनी विद्यार्थ्यांना एड्स आजाराविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांना शपथही देण्यात आली. रॅलीमध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत पर्यवेक्षक प्रा. के. जी. पाटील, प्रा. डॉ. आर. जे. काकुस्ते, प्रा. आनंद पाटील, प्रा. आर. पी. देवरे, प्रा. डी. पी. पाटील, प्रा. एम. वाय. कुवर, प्रा. डी. एम. पानपाटील, प्रा. पी. एस. सोनवणे, प्रा. यु. ए. शेलार, प्रा. बी. एन. खैरनार, समुपदेशन केंद्राचे योगेश नांद्रे, दीपक सूर्यवंशी, दत्तू हाके, सोनाली परदेशी, शीतल गावित आदी सहभागी झाले होते.



साक्री : ग्रामीण रुग्णालयात जागतिक एड्स दिनानिमित्त काढण्यात आलेल्या जनजागृती रॅली समारोपप्रसंगी उपस्थित सी. गो. पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, डॉक्टर, समुपदेशक आदी.
(छायाचित्र : धनंजय सोनवणे)

V.V.M.'s S.G.Patil Arts,Sci. & Commerce College SAKRI Dist.Dhule


Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science & Commerce College Sakri
## Dist. Dhule
## NSS Activity report
2017-18

| Name of the Activity | |
|---|---|
| Special Winter NSS Camp | |
| Date of the activity | **24/12/2017-30/12/2017** |
| Organizing Department | NSS |
| No. of teachers Participated | 03 |
| No. of Students Participated | Boys 66 Girls 59 Total 125 |
| Collaborating Agency | - |
| Impact of the Activity | To aware students about value of social contribution |





V.V.M.s' S.G.Patil Arts,Sci. & Commerce College SAKRI Dist.Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.






सकाळ
धुळे, शुक्रवार, २९ डिसेंबर २०१७

# पाटील महाविद्यालयाचे शेवाळीत हिवाळी शिबिर

सकाळ वृत्तसेवा

म्हसदी, ता. २८ : कुठल्याही कामात यश मिळविण्यासाठी जिद्द, चिकाटी आवश्यक असते. अशा परिश्रमांचे संस्कार राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरांतून होतात असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांनी केले.

साक्री येथील सी. गो. पाटील महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर शेवाळी (ता. साक्री) येथील शांतिवन अध्यापक विद्यालयात सुरू आहे, त्याप्रसंगी डॉ. अहिरे बोलत होते. शेवाळीतील विद्यार्थिनी प्राची साळुंखेच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. सरपंच मच्छिंद्र गायकवाड, शांतिवन संस्थेचे अध्यक्ष अरुण नेरकर, प्रकाश नेरकर, विजय साळुंखे, उपप्राचार्य आनंद पाटील, वैशाली सोनवणे, अशोक साळुंखे उपस्थित होते. अरुण नेरकर यांनी, मोठे व्हायचे असेल तर त्याग करायला शिका. शिबिरात खूप शिकण्यासारखे आहे, म्हणून चांगल्या गोष्टीचा स्वीकार करा, अशी अपेक्षा व्यक्त केली. शिबिरात १२५ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. आठवडाभर विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. उपप्राचार्य ए. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. पी. एस. साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आर. जी. फाकुस्ते यांनी आभार मानले.



शेवाळी (ता. साक्री) : शांतिवन अध्यापक विद्यालयात सी. गो. पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी शिबिराचे उद्घाटन करताना विद्यार्थिनी प्राची साळुंखे. शेजारी प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे, सरपंच मच्छिंद्र गायकवाड, अरुण नेरकर आदी. (छायाचित्र : दगाजी देवरे)

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.'s S.G.Patil Arts,Sci.& Commerce College SAKRI Dist.Dhule

# राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी शिबीराचा अहवाल सन-२०१७-१८

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व विद्या विकास मंडळाचे, सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या विशेष हिवाळी श्रमानुभव शिबीराचा अहवाल सादर करतांना आम्हाला विशेष आनंद होत आहे. दि. २४/१२/२०१७ ते ३०/१२/२०१७ या कालावधीत शांतीवन अध्यापक विद्यालय शेवाळी (दा.) येथे शिबीराचे आयोजन करण्यात आले. दि. २३/१२/२०१७ रोजी सर्व स्वयंसेवकांना घेऊन आम्ही शांतीवन अध्यापक विद्यालयात पोहोचलो.

दि.२४/१२/२०१७ रोजी सकाळी ठिक १० वाजता जिल्हा परिषद शाळा शेवाळी (दा.) या शाळेत इयत्ता ४ थी च्या वर्गात शिकणारी विद्यार्थीनी कु. प्राची अशोक साळुंके हिच्या हस्ते शिबीराचे उद्‌घाटन करण्यात आले. त्या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे तर प्रमुख अतिथी म्हणून शांतीवन संस्थेचे अध्यक्ष श्री. अरुण दादा नेरकर, दै. सकाळचे पत्रकार श्री. दगाजी देवरे, शेवाळी गावचे प्रथम नागरीक सरपंच श्री. मच्छिंद्र गोरख गायकवाड व इतर ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

या शिबीरात दररोज सकाळी व्यायाम, श्रमदान, वैचारीक प्रबोधन, विविध विषयांवर विद्यार्थ्यांच्या चर्चा, विविध खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यापिठाने ठरवून दिलेल्या निकषांच्या आधारे दत्तक गावी शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, आपत्ती व्यवस्थापन, ग्रामीणविकास व पाणी व्यवस्थापन या मुद्यांवर विशेष भर देण्यात आला. तसेच 'बेटी बचाव बेटी पढाव' व 'स्वच्छ भारत अभियान' या मुख्य संकल्पनांच्या आधारे विविध कार्यक्रम राबविण्यात आले.

श्रमदान प्रसंगी शेवाळी गावातील नदीचा परिसर स्वच्छ करून गावातील गल्ली बोळात स्वच्छता केली. तद्नंतर स्मशान भूमीत जाऊन स्वयंसेवकांनी साफ सफाई करून तेथील वृक्षांना आळे केले. तसेच शांतीवनचा परिसर स्वच्छ करून झाडांना पाणी देण्याच्या नियोजनासाठी चाऱ्या खोदण्यात आल्या. विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास व्हावा म्हणून विविध विषयांवर मान्यवर व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. त्यात दि. २४/१२/२०१७ रोजी एन.एस.एस. चे माजी स्वयंसेवक कु. जाई भामरे व कु. अंजुम शाह यांनी आम्ही एन.एस.एस. मध्ये कसे घडलो. तर प्रा. विश्वास भामरे यांनी सकारात्मक जीवन दृष्टीकोन या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. दि. २५/१२/२०१७ रोजी प्रा. डी. एस. चव्हाण यांनी कौशल्य विकास तर प्रा. डॉ. एस. एस. पाटोळे यांनी तंबाखूमुक्त भारत या विषयावर मार्गदर्शन केले. दि. २६/१२/२०१७ रोजी सामाजिक कार्यकर्त्या सौ. जोशिला पगारीया यांनी बेटीबचाव बेटी पढाव तर प्रा. एस. सी. सोनवणे यांनी जातीमुक्त भारत या विषयावर प्रबोधन केले. दि. २७/१२/२०१७ रोजी प्रा. डॉ. जे. एन. चौबे यांनी स्पर्धा परिक्षा युवकांमध्ये जाणीव जागृती तर प्रा. अे. पी. सोनवणे यांनी कॅशलेस इंडिया या बद्दल महत्त्वपूर्ण माहिती दिली. दि. २८/१२/२०१७ रोजी प्रा. डॉ. अशोक मराठे यांनी वृक्षसंवर्धन व पर्यावरण तर प्रा. डॉ. सतिष म्हस्के यांनी स्वच्छ भारत अभियान या बद्दल माहिती दिली. दि. २९/१२/२०१७ रोजी श्री. पी. झेड. कुवर यांनी अंधश्रध्दा निर्मुलन व जादुटोणा कायदा तर प्रा. जे. डी. जगदाळे यांनी अहिराणी म्हणीतील संस्कार या विषयी मार्गदर्शन केले. दि. ३०/१२/२०१७ रोजी श्री. योगेश नांद्रे यांनी अवयव दान व सिकलसेल बाबत मार्गदर्शन केले.

शेवाळी गावातील ग्रामस्थांसाठी देखील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यात गावातील युवतींसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यात विजेत्या स्पर्धकांना योग्य ते बक्षिस देण्यात आले. तसेच गावातील पशुंसाठी पशुवैद्यकिय चिकीत्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले त्याप्रसंगी साक्री पंचायत समितीचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. आर. एस. कदम, डॉ. कोळेकर, डॉ. कडवे व त्यांच्या सहकार्यांनी गावातील पशुंची चाचणी घेतली व आजारांविषयी माहिती दिली. तसेच पशुंची चिकीत्सा करून विविध औषधोपचार करण्यात आलेत. गावातून पथनाट्य व स्वच्छता करून स्वयंसेवकांनी स्वच्छता रॅलीचे आयोजन केले.

हे शिबीर यशस्वी करण्यासाठी आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. अहिरे यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम अधिकारी प्रा. अनंत पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. जी. काकुस्ते, प्रा. डॉ. प्रकाश साळुंके विद्यार्थी प्रतिनिधी विकी अहिरे, विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. वैशाली सोनवणे यांच्या समवेत १२५ स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घेऊन शिबीर यशस्वी केले.

Programme Officer
N. S. S.
V.V.M's S.G.Patil Arts,
Science & Commerce College
SAKRI, Dist.Dhule

Principal
V.V.M.'s S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.

V.V.M.'s S.G.Patil Arts, Sci. & Commerce College SAKRI Dist. Dhule

Principal
V.V.M.s' S. G. Patil
Arts, Science & Commerce College
SAKRI, Dist. Dhule.